25-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/24/2025 11:54 PM Page 1

रस्ता पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशारा पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

न्यूझीलंडकडून बांगलादेशचा पराभव पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 173 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 25 February 2025 | Pages 4 | ₹ 4

इंटरनेट केबल्सवर वीज खात्याची कारवाई

न्यायालयाने स्थगिती नाकारली : अनेक ठिकाणी इंटरनेट ठप्प

■ टीम दैनिक हेराल्ड :

पणजी, दि. २३ : : राज्यातील इंटरनेट सेवा पुरवठादारांनी वीजखांबांचा गैरवापर केल्याच्या प्रकरणी वीज विभागाने हाती घेतलेल्या कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने कोणतीही अंतरिम स्थगिती दिली नाही. अखिल गोवा इंटरनेट सेवा पुरवठादार संघटनेने या कारवाईला स्थगिती देण्याची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने ती फेटाळून लावत सुनावणी १८ मार्च २०२५ रोजी ठेवली आहे.

राज्यात विविध इंटरनेट सेवा पुरवठादार कंपन्यांनी वीजखांबांचा वापर करून अनधिकृतरीत्या केबल टाकल्या होत्या. ऑक्टोबर २०२३ मध्ये माहिती तंत्रज्ञान खात्याने या कंपन्यांशी बैठक घेऊन नवीन दूरसंचार धोरणानुसार राइट ऑफ वे' प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शन केले होते. त्यानंतर, नोव्हेंबर २०२३ मध्ये इंटरनेट सेवा पुरवठादारांनी यासाठी अर्ज दाखल केले. मात्र, त्यावर निर्णय घेतला गेला नाही.

दरम्यान, १ जानेवारी २०२५ रोजी केंद्र सरकारने नवीन राष्ट्रीय राइट ऑफ वे' धोरण लागू करण्याचे निर्देश दिले. या पार्श्वभूमीवर इंटरनेट सेवा पुरवठादारांनी आवश्यक परवानग्यांसाठी अर्ज सादर केला होता. मात्र, त्याआधीच वीज खात्याने रायबंदर, मडगाव, चिंबल आणि म्हापसा परिसरात अनधिकृतरीत्या लावलेल्या इंटरनेट केबल्स कापण्यास सुरुवात केली. त्यामुळे हजारो ग्राहकांची ब्रॉडबँड सेवा ठप्प झाली.

अनधिकृत केबल कापण्याच्या कारवाईविरोधात अखिल गोवा इंटरनेट सेवा पुरवठादार संघटनेने न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणी वीज खात्याच्या कारवाईला स्थगिती द्यावी, अशी विनंती करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने ती फेटाळली असून आता पुढील सुनावणी १८ मार्च रोजी होणार आहे.

या प्रकरणावर वीज खात्याचे कार्यकारी अभियंते काशिनाथ शेट्ये यांनी सांगितले की, आम्ही वारंवार नोटिसा बजावूनदेखील केबल ऑपरेटर कंपन्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे आम्ही अनधिकृतरित्या टाकलेले केबल्स कापण्यास सुरुवात केली आहे. न्यायालयानेही याचिकाकर्त्यांना अंतरिम दिलासा दिलेला नाही. त्यामुळे पुढील कारवाई लवकरच करण्यात येईल.

या कारवाईमुळे २ ते ३ लाख ग्राहक इंटरनेट सेवेस मुकतील, असा दावा करत ऑल गोवा इंटरनेट सेवा पुरवठादार संघटनेने वीज खात्याला केबल तोडण्यापासून रोखण्याची मागणी केली आहे. हे प्रकरण न्यायालयात असून आम्ही सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यास तयार आहोत. परंतु, वीज खात्याने घाईगडबड करू नये, असे संघटनेचे म्हणणे आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ मार्च २०२५ रोजी होणार आहे. तोपर्यंत वीज खात्याची कारवाई सुरू राहील का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे.

आगोंद समुद्रकिनाऱ्यावर ६७ बेकायदेशीर व्यवसाय

▶ राज्य सरकारने न्यायालयात सादर केली माहिती

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २४ : काणकोण तालुक्यातील आगोंद समुद्रकिनाऱ्याजवळ सुमारे ६७ व्यावसायिक आस्थापने बेकायदेशीरपणे कार्यरत असल्याची माहिती राज्य सरकारने सोमवारी उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठासमोर सादर केली. ही सुनावणी अमन गुप्ता यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या (पीआयएल) अनुषंगाने पार पडली. गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी ने आपल्या अहवालात स्पष्ट केले की, आगोंद समुद्रकिनाऱ्यावर संरक्षित ऑलिव्ह रिडले कासवांच्या घरट्याजवळ ही बेकायदेशीर आस्थापने उभारण्यात आली आहेत. यासंदर्भात संबंधित आस्थापनांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने राज्य सरकारी अधिकाऱ्यांना या प्रकरणात विलंब न करता कारणे दाखवा नोटिसांचा जलद निपटारा करण्याचे निर्देश दिले. याचिकाकर्त्याने असा दावा केला की, कासवांच्या घरट्यांच्या जवळ कोणत्याही प्रकारच्या बांधकामांना परवानगी देता येणार नाही. मात्र, महाधिवक्ता देविदास पांगम यांनी न्यायालयाला सांगितले की, कासवांच्या घरट्यांच्या जागी कोणत्याही नव्या बांधकामांना परवानगी देण्यात आलेली नाही. तसेच, २०१७ च्या अहवालानुसार, समुद्रकिनाऱ्याच्या क्षमतेच्या मर्यादित राहूनच काही बांधकामे उभारण्यात आली आहेत. महाधिवक्ता पांगम यांनी स्पष्ट केले की, कायद्याने काही विशिष्ट प्रकारच्या बांधकामांना परवानगी दिली आहे. तथापि, जीसीझेडएमएने अनधिकृत ६७ आस्थापनांना नोटिसा बजावल्या असून, त्यावर लवकरच योग्य ती कारवाई केली जाईल.

गेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाने जीसीझेडएमएला निर्देश दिले होते की, आगोंद समुद्रकिनाऱ्यावर संरक्षित क्षेत्रात उभारलेल्या बेकायदेशीर व्यावसायिक प्रतिष्ठानांवर कारवाई करावी. याचिकाकर्त्याने असा दावा केला होता की, हा परिसर 'नो डेव्हलपमेंट झोन'म्हणून घोषित करण्यात यावा. याचिकाकर्त्याने न्यायालयासमोर हेही निदर्शनास आणून दिले की, सुमारे ८२,००० चौरस मीटरचा समुद्रकिनारा कासवांच्या घरट्यासाठी राखीव करण्यात आला असून, तेथे कोणत्याही प्रकारची व्यावसायिक गतिविधी होऊ शकत नाही. या प्रकरणी याचिकाकर्त्याचे प्रतिनिधित्व ॲड. विवेक रॉड्रिग्ज करत आहेत. पुढील सुनावणी पुढील आठवड्यात होणार आहे.

निवडक

पंजाब सरकारने केले ४० ट्रॅव्हल एजंट्सचे परवाने रद्द

चंदीगड, दि. २४ : अमेरिकेतील बेकायदा भारतीय स्थलांतरितांना पुन्हा मायदेशात परत पाठवण्याची प्रक्रिया अमेरिका करत आहे. काही दिवसांपूर्वी अमेरिकेच्या लष्करी विमानाने अमेरिकेतील बेकायदा भारतीय स्थलांतरितांना परत पाठवले. मात्र, पाठवताना स्थलांतरितांच्या हाता-पायात बेड्या घालण्यात आल्या होत्या, असे आरोप झाले. यावरून भारतातील राजकारण चांगलंच ढवळून निघाले. दरम्यान, भारतातील नागरिकांना बेकायदेशीरपणे अमेरिकेत पाठवण्यात काही ट्रॅव्हल एजंट्स सहभाग असल्याचा आरोप होत आहे. यावरून आता पंजाब सरकारने मोठी कारवाई केली आहे. पंजाब सरकारने ४० ट्रॅव्हल एजंट्सचे परवाने रद्द केल्याची माहिती समोर आली आहे. तसेच परवाना नसलेल्या ट्रॅव्हल एजंट्सवरही पंजाब सरकारने कारवाई करण्यास सुरुवात केली असल्याची माहिती सांगितली जात आहे. आज ४० ट्रॅव्हल एजंट्सवर कारवाई करण्यात आली आहे. हे ट्रॅव्हल एजंट्स लोकांना आमिष दाखवून डंकी रूट'ने अमेरिकेत पाठवत असल्याचा आरोप आहे.

चान्सलर स्कोल्झ यांचा पराभव

बर्लिन, दि. २४ : जर्मन चांसलर ओलाफ स्कोल्झ यांचा सार्वत्रिक निवडणुकीत पराभव झाला आहे. त्यांच्या सोशल डेमोक्रॅट्स पक्षाला ६३० पैकी फक्त १२१ जागा जिंकता आल्या. त्यांना फक्त १६.५७ मते मिळाली. चांसलर स्कोल्झ यांनी पराभव स्वीकारला आहे. निवडणूक निकालांमध्ये त्यांचा पक्ष तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. रूढीवादी विरोधी पक्षनेते फ्रेडरिक मर्झ यांच्या ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन (सीडीयू) पक्षाच्या युतीने २०८ जागा जिंकल्या आहेत. त्यांना २८.५७ मते मिळाली. निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विजयी पक्ष म्हणजे अति-उजवा पक्ष (ऋऊ). या पक्षाने १५१ जागा जिंकल्या आहेत. पक्षाला २०.८७ मते मिळाली. दुसऱ्या महायुद्धानंतर पहिल्यांदाच, जर्मनीमध्ये एका कट्टर उजव्या विचारसरणीच्या पक्षाने इतक्या जागा जिंकल्या आहेत. जर्मनीमध्ये बहुमतासाठी ३१५ जागा आवश्यक आहेत आणि कोणताही पक्ष स्वतःहून हा आकडा गाठू शकत नाही असे दिसते. त्यामुळे युती सरकार स्थापन होणे निश्चित मानले जात आहे.

कामगारांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू

हैदराबाद, दि. २४ : तेलंगणा या ठिकाणी झालेल्या बोगदा दुर्घटनेत आठ कामगार अडकून पडले आहेत. या आठ कामगारांना वाचवण्यासाठी कसोशीचे प्रयत्न सुरु आहेत. शनिवारी तेलंगणातील नागरकुरनूल जिल्ह्यात श्रीशैलम लेफट बँक कॅनॉल बोगदा प्रकल्पाचा भाग कोसळला. या ठिकाणी आठ कामगार अडकून पडले आहेत. मागच्या ४८ तासांपासून त्यांना सुरक्षित बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु आहेत. बोगदा दुर्घटनेत अडकलेल्या गुमला जिल्ह्यातील चार कामगारांमध्ये सदर पोलीस स्टेशन परिसरातील तिर्रा गावातील रहिवासी संतोष साहू, घाघरा पोलीस स्टेशन परिसरातील खांभिया कुंबा, टोली येथील रहिवासी अनुज साहू, रायडीह पोलीस स्टेशन परिसरातील कोबी, टोली गावातील रहिवासी जगता खेश आणि पालकोट पोलीस स्टेशन परिसरातील उमदा नाकती, टोली गावातील रहिवासी संदीप साहू यांचा समावेश आहे. बोगद्यात चिखल आणि पाणी साठलं आहे. त्यामुळे बोगद्यात मशीनद्वारे मदतकार्य करण्यास अडचणी येत आहेत.

हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६)

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

आशिष नेहराने अनधिकृत रस्ता हटवला; पुढील कारवाईबाबत अनिश्चितता

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २४ : माजी भारतीय क्रिकेटपटू आशिष नेहराच्या प्रतिनिधींनी केळशी येथील नो डेव्हलपमेंट झोन (एनडीझेड)मध्ये अनधिकृतरित्या बांधलेला रस्ता हटवल्याचा दावा केला असला, तरी पुढील कारवाईबाबत अनिश्चितता कायम आहे. रस्ता काढण्यात आला असला तरी, ढिगाऱ्यांचे व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांकडून दंडात्मक कारवाई होणार का, यावर प्रश्नचिन्ह आहे.

गोवा किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (जीसीझेडएमए) कडून नेहरा यांना अनधिकृत बांधकाम हटवण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यांनी आदेशांचे पालन केल्यानंतर (जीसीझेडएमए) ने कारणे दाखवा नोटीस बजावल्याची माहिती मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर, केळशी पंचायतीने संबंधित जागेची पाहणी केली. मात्र, एनडीझेड नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पुढील कारवाई केली जाणार का, याबद्दल अजूनही स्पष्टता नाही.

नेहराच्या प्रतिनिधींनी नियमांचे पालन केल्याची माहिती मिळाल्यानंतर, सरपंच डिक्सन वाझ, वॉर्ड पंच जिझस डी'कोस्टा आणि पंचायत सचिवांनी घटनास्थळी भेट दिली. या पाहणीनंतर वाझ यांनी माध्यमांना सांगितले, रस्ता काढून टाकण्यात आला आहे, मात्र काही अवशेष आणि दगडांचे ढिगारे अजूनही तिथे पडलेले आहेत. या प्रकरणावर पुढील पंचायत बैठकीत चर्चा केली जाईल. यासंदर्भात पुढील संभाव्य कारवाईबाबत विचारले असता, वाझ म्हणाले की, पंचायत जीसीझेडएमए शी संपर्क साधणार आहे. अधिकाऱ्यांकडून काही दंड आकारण्यात येणार आहे का, याबाबत आम्ही त्यांच्या निर्णयाची वाट पाहत आहोत.

वॉर्ड पंच जिझस डी'कोस्टा यांनी नमूद केले की, पंचायतीकडून योग्य ती पावले उचलण्यात आली असली तरी परिस्थिती चुकीच्या पद्धतीने सादर केली जात आहे. दगड काढून एका ठिकाणी टाकण्यात आले आहेत. आम्ही हा विषय पंचायत बैठकीत चर्चेसाठी मांडणार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या अनधिकृत रस्त्याच्या बांधकामावरून आधीच वाद निर्माण झाला होता. स्थानिक ग्रामस्थांनी यापूर्वीही आगीमुळे झाडे जाळली जात असल्याचा आणि वाळूच्या ढिगाऱ्यांत छेडछाड होत असल्याचा आरोप केला होता. त्यामुळे आता अधिकाऱ्यांकडून पुढील कारवाई केली जाते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पर्वरीत यंदा कार्निव्हल आणि शिगमो उत्सव रद्द

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २४ : पर्वरी येथे यंदा २८ फेब्रुवारी रोजी होणारा कार्निव्हल आणि २९ मार्चला होणारा शिगमो उत्सव रद्द करण्याचा निर्णय आयोजक समितीने घेतला आहे. सध्या सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामामुळे वाहतूक कोंडी वाढल्याने सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून हा निर्णय घेण्यात आला आहे.

सध्या पर्वरी परिसरात मोठ्या प्रमाणावर उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे या मार्गावर वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच जुन्या मांडवी पुलाच्या दुरुस्तीमुळे पणजी-पर्वरी मार्गावरील वाहतूक अधिकच विस्कळीत झाली आहे. अशा परिस्थितीत मोठ्या संख्येने लोक एकत्र जमणाऱ्या कार्निव्हल आणि शिगमो उत्सवांचे आयोजन केल्यास अधिक अडचणी निर्माण होऊ शकतात, अशी चिंता आयोजक व प्रशासनाने व्यक्त केली आहे. पर्वरीत दरवर्षी कार्निव्हल व शिगमो हे मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. आकर्षक फ्लोट्स, पारंपरिक नृत्य, ढोल-ताशांच्या गजरात साजऱ्या होणाऱ्या मिरवणुकींना मोठी लोकप्रियता आहे. गोव्याच्या विविध भागांतून पर्यटक व कलाकार येथे हजेरी लावतात. मात्र, यंदा हा उत्सव

पान २ ▶

मांद्रे पोलिस स्थानकात संतप्त जमावाची धडक

आरोपी बत्राला खाजगी गाडीतून नेताना रोखले

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २४ : शेकडोंच्या संख्येने एकत्र येत मांद्रे मधल्या संतप्त जमावाने सोमवारी रात्री पोलिस स्टेशनला धडक दिली. दीपन बत्राला कठोरात कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी लावून धरत कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीत गोव्याचा बिहार झाला आहे, असा आरोप संतप्त जमावाने केला.

मांद्रेमधल्या जुनसवाडा परिसरातल्या ७० वर्षीय मेरी फेलीज फर्नांडिस यांच्यावर कार चढवून झालेल्या हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या आरोपी दीपन राजीव बत्रा (२३) याला खाजगी कारमधून पेडणे इथल्या कस्टडीत घेऊन जात असताना संतप्त ग्रामस्थांनी त्याची गाडी अडवली. खुनाचा गुन्हा दाखल असलेल्या आरोपीला खाजगी कारने पोलिस कुठेतरी घेऊन जात आहेत अशी बातमी पसरताच हा हा म्हणता शेकडो ग्रामस्थ मांद्रे पोलिस स्टेशनमध्ये दाखल होण्यास सुरुवात झाली. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसह महिलांचाही सहभाग होता. या संतप्त जमावाने आरोपी दीपन बत्रा याला घेऊन जाणारी गाडी पोलिस स्थानकात परतवली आणि गाडीला घेराव घातला. दरम्यान मांद्रे पोलिस स्थानकाचे पोलिस निरीक्षक घटनास्थळी हजर नसल्याने जमावाच्या संतापात आणखी भर पडली. पोलिस निरीक्षक आल्याशिवाय बत्राला सोडणार नाही अशी भूमिका नागरिकांनी घेतली.

घटनास्थळी पोलिस निरीक्षक दाखल झाल्यानंतर संतप्त जमावाशी त्यांनी चर्चा केली. यावेळी न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आलेल्या आरोपीला कायद्याने चौकशीसाठी पोलिस कोठडीत पण घेता येते असे स्पष्टीकरण पोलिस निरीक्षकांनी जमावाला दिले. सर्वात महत्वाचे म्हणजे नव्याने सुरू झालेल्या मांद्रे पोलिस स्थानकात आरोपींना ठेवायला कस्टडीच नाही, शिवाय स्वत:चे वाहन नाही. त्यामूळे आरोपीला खाजगी वाहनाने पेडणे इथल्या लॉकअप मध्ये नेण्यात येत होते अशी माहिती पोलिसांनी जमावाला दिली. बराच वेळ पोलिसांशी चर्चा केल्यानंतर लोकांनी आपले आंदोलन स्थगित केल .दरम्यान घटनास्थळी जमलेल्या संतप्त जमावाने मेरी फर्नांडिस यांना न्याय मिळालाच पाहिजे अशी मागणी करीत मांद्रे पोलिस स्थानकाच्या कारभारावर जोरदार टिका केली. राज्यात कोणीही बाहेरचे येऊन राजरोस खून करतात आणि आमचे पोलिस अशा खुन्याना व्हीआयपी ट्रीटमेंट देतात असा आरोप यावेळी संतप्त नागरिकांनी केला. आरोपी दीपन राजीव बत्रा याची पोलिस कोठडी मंगळवारी संपत असल्याने त्याला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. जुनसवाडा परिसरातल्या ७० वर्षीय मेरी फेलीज फर्नांडिस यांच्यावर कार चढवून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी आरोपी दीपन बत्रावर बीएनएस (२०२३) च्या कलम १०३ आणि २८१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाकुंभ आयोजनावरून राजकीय वातावरण तापले!

२६ रोजी अंतिम स्नान : समाजवादी आणि कॉंग्रेसकडून भाजपावर भ्रष्टाचाराचे आरोप

प्रयागराज, दि. २४ :

प्रयागराज येथे सुरू असलेल्या कुंभ मेळाव्यावर उत्तर प्रदेश सरकारने भव्य यशाचा दावा केला असला, तरी विरोधकांनी प्रशासनावर भ्रष्टाचार व अव्यवस्थेचे गंभीर आरोप केले आहेत. विशेषतः महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी राज्य सरकारवर निशाणा साधत कुंभसंबंधित अनागोंदी व भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत.

समाजवादी पक्षाने कुंभसाठी मंजूर केलेल्या निधीचा अपव्यय झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. शौचालयांपासून ते बोरिंगपर्यंत प्रत्येक ठिकाणी अनियमितता आढळली आहे, असा आरोप अखिलेश यादव यांनी केला. त्यांच्यासोबत समाजवादी पक्षाचे प्रवक्ते उदयवीर सिंह यांनीही सरकारवर टीका करत म्हटले की, या वेळी कुंभसाठी बजेट मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आले, मात्र आवश्यक सुविधा पुरवण्यात सरकार अपयशी ठरले आहे.

अखिलेश यादव यांनी कुंभाच्या व्यवस्थापनातील त्रुटींचा पाढा वाचताना, ट्रॅफिक जॅम, वॉशरूमच्या अभावामुळे निर्माण झालेली गैरसोय, उपासमार झालेल्या भाविकांची स्थिती आणि चेंगराचेंगरीत मृत्यूमुखी पडलेले लोक, यांची आकडेवारी सरकारकडे नाही, असे सांगितले. त्यांनी सरकारवर १५ हजार कोटी रुपये खर्च करूनही अपुऱ्या सुविधा पुरवल्याचा आरोप केला.

काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेत्या आराधना मिश्रा यांनी देखील उत्तर प्रदेश राज्य सरकारवर टीका करत म्हटले की, कुंभ मेळाव्यासाठी बजेट तर वाढवण्यात आले, पण व्यवस्थापन पूर्णपणे कोसळले आहे.

समाजवादी पक्षाच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना भारतीय जनता पक्षाने हे आरोप निराधार असल्याचे सांगितले. भाजपचे प्रवक्ते मनीष शुक्ला म्हणाले, महाकुंभाच्या यशस्वी आयोजनामुळे विरोधक अस्वस्थ झाले आहेत. अखिलेश यादव यांनी सत्य माहिती द्यावी; केवळ आरोप करून काहीही साध्य होणार नाही.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विधानसभेत उत्तर देताना म्हटले, समाजवादी पक्षाचा सनातन संस्कृतीवर विश्वास नाही. कुंभ हा समाजाचा उत्सव आहे आणि सरकारने केवळ सेवकाची भूमिका बजावली आहे.

उत्तर प्रदेश सरकारच्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत ६२ कोटी लोकांनी कुंभामध्ये स्नान केले आहे. सोमवारी संध्याकाळपर्यंत एक कोटीहून अधिक भाविकांनी संगमात स्नान केल्याची नोंद आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोपाच्या पार्श्वभूमीवर, २९ जानेवारी रोजी संगम परिसरात चेंगराचेंगरी झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. उत्तर प्रदेश सरकारच्या माहितीनुसार, या दुर्घटनेत ३० जणांचा मृत्यू झाला होता. शेवटच्या स्नानाच्या दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी रोजी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशासनाने अतिरिक्त सुरक्षा दल तैनात केल्याची माहिती प्रयागराजचे डीआयजी वैभव कृष्णा यांनी दिली. कुंभ मेळावा संपल्यानंतर या प्रकरणावर अधिक राजकीय संघर्ष होण्याची शक्यता असून, विरोधक प्रशासनाविरोधात अधिक आक्रमक भूमिका घेत आहेत. मात्र, योगी सरकारने या कुंभाला आतापर्यंतचा सर्वांत यशस्वी कुंभ असल्याचे घोषित करत विरोधकांच्या आरोपांना पूर्णपणे फेटाळून लावले आहे.